प्रेसनोट दिनांक २३/०३/२०१९

## समर्थ पोलीस ठाणे पुणे शहर

## पीएमपीएमएल बस चालकास बसमध्ये घुसून मारहाण करुन पळून जाणा-यास अटक

दिनांक १५/३/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा पुणे स्टेशन ते कोथरुड डेपो या मार्गावरील पीएमपीएमएल बस ही अपोलो चौक बसस्टॉप वर बसचालक  हे बस थांबवित होते. याच  सुमारास होंडा ॲक्टीव्हा गाडी वरील चालक याने आपले वाहन रॉंगसाईडने बसचे समोरुन बेदरकारपणे चालवून रहदारीचा नियमाचे उल्लंघन करीत हयगयीने व अविचाराने चालवून बसच्या समोर दुचाकी आडवी लावून बसचा मार्ग रोखला व आपले दुचाकीवरुन खाली उतरुन अचानकपणे बसमध्ये घुसून बसचालक यास शिवीगाळ करीत बाजूने जात असताना गाडी अंगावर घालून दाबले असा आरोप करीत बसचे ड्रायव्हर केबीनमध्ये घूसून चालकावर हल्ला करुन त्यांस हाताने मारहाण केली व आपला राग शांत करुन घेऊन तो तितक्याच घाईने बसमधून उतरुन त्याचे ॲक्टीव्हा गाडीसह तेथून पळून गेला परंतु दक्ष पुणेकर असलेले बसप्रवाशांनी त्याचे ॲक्टीव्हा गाडीचा क्रमांक टिपला होता. तसेच पुण्यातील रस्त्यांवर जागजागी लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरा नामक तिसरा डोळयाने देखील घटना टिपली होती.

सदर मारहाणीबाबत बसचालक यांनी समर्थ पोलीस ठाणे, पुणे येथे दिलेले तक्रारीनुसार गुन्हा रजि. नं. ६९/२०१९ भादवि.क.३५३,५०४,३२३.३४१,२७९ मोव्हेॲ.क. १८४,११९/१७७ पमाणे नोंद करण्यात आला होता. गुन्हयाचा तपास हा पोलीस उप निरीक्षक श्री. प्रदीप उर्फ बाबा पालांडे समर्थ पोस्टे पुणे यांचेकडे देण्यात आलेला होता. त्यांनी या घटना ठिकाणी भेट देऊन स्थानिक सीसीटीव्ही कॅमेरे चेक करुन त्याचे फुटेज प्राप्त केले. तसेच स्थानिकांकडे चौकशी करुन आरोपीचा गाडी क्रमांकाची खात्री केली. आरटीओ पुणे कार्याल्याकडून गाडी क्रमांकावरुन गाडीधारक यांची माहिती प्राप्त केली.  त्यास निष्पन्न करुन आरोपी नामे - फकीर मारुती डेंगळे रा. कामगार पुतळ्याजवळ, शिवाजीनगर, पुणे यास गुन्हयात अटक केली आहे. सरकारी नोकर तथा लोकसेवकावर हल्ला करण्यात आल्यास अशा गुन्हा अजामीनपात्र करणेबाबत नवीन सुधारणा झालेल्या आहेत. यामुळे अटक आरोपीस मा. न्यायालयात हजर करण्यात आलेवर त्यांस येरवडा कारागृहात पाठविण्यात आलेले आहे.

शासकीय नोकर व लोकसेवक यांचेवर हल्ला करणा-यांनी याची दखल घेऊन यापूढे असे प्रकार टाळावेत नाहीतर त्यांना देखील येरवडा कारागृहात जाण्याची वेळ येऊ शकते याची दखल घ्यावी.